## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांचे कार्यालय

## निविदा सुचना

क्रमांक: बी ५८(४)/ ३०१८ /५९, भाग-२, भंडारा, दिनांक :- १८ ऑगष्ट, २०२६

जिल्हा न्यायालय, भंडारा ह्या कार्यालयात १८० गठ्ठे रद्दी (शासकीय नियमानुसार नस्ती व श्रेडिंग मशीन द्वारे फाडलेले रेकॉर्ड्‌स यांचा समावेश आहे) विकणे आहे. त्याकरीता खालील अटी व शर्तीवर **दिनांक २५/०८/२०२६ ला सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** या कार्यालयाला पोहचेल अश्या रितीने मोहोरबंद लिफाफ्यात निविदा/दरपत्रक बोलाविण्यात येत आहे. निविदाधारकांनी **'रद्दी खरेदीकरीता निविदा/दरपत्रक'** असे ठळक अक्षरात लिहिलेली निविदा 'माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा' या नावाने पाठविण्यात याव्यात.

**निविदा पाठविण-याला खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.**

१. मोहोरबंद निविदे सोबत अनामत **रुपये २,०००/- (रुपये दोन हजार फक्त)** जमा करावी लागेल, त्याशिवाय निविदा विचारात घेण्यात येणार नाही. निविदा नामंजूर झाल्यास अमानत रक्कम त्वरीत परत करण्यात येईल.

२. रद्दीचा दर नमुद करतांना **१०० (शंभर)** किलोचा भाव नमूद करावा.

३. सरकारी नियमानुसार निविदा मंजूर झाल्यापासून व त्याची सुचना संबंधित खरीददाराचे नावे टपालपत्राने पाठविण्यात येईल व ती पोच मिळाल्यापासुन तीन दिवसाचे आत माल उचल करावा लागेल.

४. खरेदीधारकास रद्दी भरण्याकरीता स्वतःचे पोते आणावे लागेल. माल विहित मुदतीत उचलला नाही तर त्यांनी जमा केलेली अमानत रक्कम **रुपये २,०००/-** सरकार जमा करण्यात येईल त्यानंतर त्याचा कोणताही अधिकार राहणार नाही व त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

५. रद्दी मोजण्याकरीता तराजू व प्रचलित वजनांची व्यवस्था खरेदीदारने स्वखर्चाने करावी लागेल.

६. मालाच्या किंमतीनुसार कायद्याप्रमाणे सेलटॅक्स आणि जनरल टॅक्स निविदेत दर्शविल्या व्यतिरिक्त खरेदीदाराला द्यावा लागेल.

७. मालाची किंमत व टॅक्स ताबडतोब जमा करुन माल खरेदीदाराला स्वतःचे ताब्यात घ्यावा लागेल. हिशोब झाल्यावर मालाबाबत कार्यालय जबाबदार राहणार नाही.

८. निविदा मंजूर करणे, अगर रद्द करणे याचा संपुर्ण अधिकार **''साहित्य खरेदी समिती''** भंडारा यांना राहिल.

आदेशान्वये

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, भंडारा.

क्रमांक: बी ५८(४)/३०१८(अ)/५९, भाग-२.

**<u>प्रतिलिपी</u> :-**

एक प्रत माननीय जिल्हा न्यायालय, भंडारा /दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, भंडारा/मुख्य न्यायदंडाधिकारी, भंडारा यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात यावी तसेच जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध कण्यात यावे.

जिल्हा न्यायालय, भंडारा.
दिनांक १८ /०८/२०२६.

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, भंडारा